क्रमांक –सीईआर-२०२०/प्र.क्र.०७/३०,

सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३रा मजला,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक: १४ जानेवारी,२०२०

<u>तात्काळ</u>

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

२. विभागीय आयुक्त,पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक,अमरावती व कोकण यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पोलिस अधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणा-या पथकांच्या अधिका-यांशी विचार विनिमय करुन प्रजासत्ताक दिनी मुख्यालयात संयुक्त संचलनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

३. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधित जिल्हाधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणा-या पथकांच्या अधिका-यांशी विचारविनिमय करुन मुंबई व जिल्हा मुख्यालये येथे संयुक्त संचलनाची व्यवस्था करावी.

४. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य मुंबई, यांनी विभागीय ठिकाणी व जिल्हा मुख्यालये येथे नेहमीप्रमाणे देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे व या कार्यक्रमांना कोणत्याही करमणुकीच्या कार्यक्रमाचे स्वरुप नसावे याकरिता योग्य ती तजवीज करावी. मुंबईत दरवर्षीप्रमाणे चौपाटी, नरेपार्क, वांद्रे येथील शासकीय वसाहत या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करावे.

सही/-
**(रा.गो.गायकवाड)**
**अवरसचिव,महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग(राजशिष्टाचार)**

**सामान्य प्रशासन विभाग**

<u>कार्यालय</u>

पाहिले

प्रस्तुत परिपत्रकाच्या प्रती सर्व खाते प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता पाठवाव्यात.

सही/- २०.१.२०२०
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/- २०.१.२०२०
सह आयुक्त (सा.प्र.)

महापालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/६०/सर्वसा/(एमओपी/८०६)
दिनांक:२२.१.२०२०

प्रत------------------------------------------------------यांना(जादा----------- प्रतीसह)
माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

२२/१/२०२०
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

**क्र.सीईआर-२०२०/प्र.क्र.०७/३०,**

**तात्काळ**

सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक : १४ जानेवारी, २०२०

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय : प्रजासत्ताक दिन साजरा करण्याबाबत...
दिनांक २६ जानेवारी, २०२०.

बृहन्मुंबई, सर्व विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त करावयाचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या कार्यक्रमपत्रानुसार आयोजित करण्यात यावा. नेहमीप्रमाणे विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी स्वत:च्या अध्यक्षतेखाली जिल्हा मुख्यालय येथे प्रजासत्ताक दिनाचा अशासकीय कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नागरिकांच्या समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांनी शैक्षणिक संस्था, कुटुंबियांचे मेळावे व व्यक्ति याद्वारे प्रजासत्ताक दिनाचा समारंभ साजरा करण्यासाठी योग्य अशी कार्यवाही करावी. ज्या कार्यक्रमांविषयी दुमत होण्याचा संभव आहे, अशांचा अतंर्भाव कोणत्याही कार्यक्रमात करण्यात येऊ नये. ज्या ठिकाणी शक्य असेल अशा सर्व ठिकाणी प्रभात फेऱ्या आयोजित करण्यात याव्यात.

२. मुंबई तसेच विभागीय व जिल्ह्यांच्या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. तथापि, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन हे देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी असावे.

३. विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी संबंधीत पालकमंत्री राष्ट्रध्वजारोहण करतील. तसेच राष्ट्रध्वजारोहण करणारे मा.मंत्री / राज्यमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी वेळेवर पोहचू न शकल्यास विभागीय मुख्यालयी, विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकाऱ्यांनी राष्ट्रध्वजारोहण करावे व ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी. तसेच, संबंधित प्रांत अधिकारी व तहसिलदार हे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालये येथे ध्वजारोहण समारंभाच्या शासकीय कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान स्विकारतील. मुंबईमध्ये व इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी पोलीस, गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्रसेना, रेल्वे सुरक्षा दल, लोक सहायक सेवा व भारत स्काऊटस् आणि गाईडस् यांचे संयुक्त संचलन करण्यात यावे. संचलन आटोपल्यानंतर शहराच्या प्रमुख रस्त्यांवरुन संचलन करण्यात यावे. महाराष्ट्र राज्यामध्ये वरील दिवशी सर्व शासकीय व सार्वजनिक इमारतींवर, किल्ल्यांवर, तसेच जिल्ह्यांमध्ये ऐतिहासिक महत्वाच्या ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत.

४. दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे सकाळी ०९.१५ वाजता आयोजित करण्यात यावा. जास्तीत जास्त व्यक्तींना या मुख्य शासकीय समारंभात सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ०८.३० ते १०.०० च्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येवू नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावासा वाटल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ०८.३० वा. च्या पूर्वी किंवा १०.०० वा. च्या नंतर करावा.

५. दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी मुंबई व नागपूर येथे शासकीय इमारतींवर विद्युत रोषणाई करण्यात यावी.

६. राष्ट्रध्वजाला वंदन करताना "जन-गण-मन" हे राष्ट्रगीत वाजविण्यात यावे. ध्वजारोहण समारंभ अध्यक्षस्थान स्वीकारणाऱ्या मान्यवरांनी / अधिकाऱ्यांनी अशा प्रसंगी भाषण करावे किंवा नाही हे स्वत: ठरवावे. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँन्ड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजविण्यास हरकत नसावी.

७. राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक एफएलजी-१०९१/३०, दिनांक २ मार्च, १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९१/(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९८/

Scanned by CamScanner

(ध्वजसंहिता)/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. ध्वजारोहणाची रंगीत तालीम घेतली जाईल याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात. राष्ट्रध्वज सुस्थितीत असल्याबाबत व सूर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

८. प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी अगत्यपूर्वक उपस्थित रहाण्याबाबत त्यांना विनंती करण्यात यावी.

९. उत्सव अथवा औपचारिक प्रसंगी परिधान करावयाचा राष्ट्रीय पोषाख प्रजासत्ताक दिन समारंभ प्रसंगी उपस्थित रहाणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी व व्यक्तींनी परिधान करावा असा सल्ला त्यांना मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी व सर्व संबंधित विभाग / कार्यालय प्रमुख यांनी द्यावा.

१०. मा. खासदार/आमदार/ नगरसेवक/स्वातंत्र्य सैनिक/शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडीलांना, स्थानिक राजकीय पक्षांचे प्रमुख, शासन पुरस्कार प्राप्त व्यक्ती, स्थानिक शासकीय अधिकारी आणि प्रमुख नागरिक यांना मुख्य शासकीय समारंभास उपस्थित राहण्याचे निमंत्रण द्यावे.

११. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती यांनी मागील पानावर दर्शविल्याप्रमाणे नवी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती येथे समारंभ करण्याबाबत योग्य ती व्यवस्था सर्व संबंधितांच्या सल्लामसलतीने करावी.

१२. विभागीय आयुक्त, कोंकण, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती हे त्यांच्या मुख्यालयात ध्वजारोहण समारंभाकरिता योग्य ती व्यवस्था करणार असल्यामुळे जिल्हाधिकारी पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती येथे या संबंधी वेगळे कार्यक्रम करण्याची आवश्यता नाही.

१३. मा. राज्यपाल हे सकाळी मुंबईत शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे प्रमुख कार्यक्रमात ध्वजारोहण करतील.

१४. संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपापल्या अधिकार क्षेत्रात प्रजासत्ताक दिन समारंभ साजरा करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. त्यांच्या अधिकार क्षेत्रात त्या दिवशी समारंभाबाबत सर्व बाबी योग्य तऱ्हेने कार्यवाहीत येतील याबाबत त्यांनी व्यक्तीशः दक्षता घ्यावी. तसेच देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतींसाठी सांस्कृतिक कार्यक्रम व्यवस्थितपणे आणि समाधानकारकपणे आयोजिले जात आहे, याचीही पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दक्षता घ्यावी.

१५. **निवडणूक आचारसंहिता** अंमलात असल्यास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत असून सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी :-

अ) ध्वजारोहणाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये.

ब) कार्यक्रमाचा राजकीय व्यासपीठासारखा वापर करु नये.

क) मा.पालकमंत्री यांच्या भाषणाचा आशय केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक मान्यवरांचे कार्य आणि कर्तृत्व यापुरतेच मर्यादित असावा आणि त्यांनी कोणतेही राजकीय स्वरुपाचे भाषण करु नये, बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या तसेच देशाचा गौरव यापुरतीच भाषणे मर्यादित असावीत.

Rajendra G Gaikwad

Digitally signed by Rajendra G Gaikwad
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=e18e8c2154c8ecbcf0edc1fcc5b3e74c50aa53537f32c40ea2c1af9814e56681, cn=Rajendra G Gaikwad
Date: 2020.01.14 15:43:37 +05'30'

**( रा. गो. गायकवाड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार )**

---------------

Scanned by CamScanner

तात्काळ

क्र.सीईआर-२०२०/प्र.क्र.०७/३०,
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १४ जानेवारी, २०२०.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
सर्व अप्पर मुख्य सचिव / सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई, (२ प्रती)
राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई, (२ प्रती)
विभागीय आयुक्त कोंकण विभाग, पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद विभाग
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. (२ प्रती) (पत्राने)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने)
राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई (२ प्रती),
प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने)
प्रबंधक लोकआयुक्त,
फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ, वेस्टर्न नेव्हल कमांड, मुंबई.
जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र व गुजरात विभाग, मुंबई
एअर ऑफिसर कमांडिंग, हेडक्वॉटर्स, मेरीटाईम एअर ऑपरेशन्स, आयएएफ,आयएएफ बिल्डींग, धोबी तलाव, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, मुंबई,
महासमादेशक, नागरी संरक्षण दल, मुंबई
स्टेशन कमांडर, इंडियन एअर फोर्स स्टेशन, मुंबई.
इतर सर्व मंत्रालयीन विभाग, (मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह)
केंद्र संचालक, दूरदर्शन, वरळी, मुंबई नं. ४०००१८
केंद्र संचालक, आकाशवाणी, मुंबई नागपूर, पुणे, औरंगाबाद.
पोलीस आयुक्त, नागपूर, पुणे, औरंगाबाद, ठाणे, सोलापूर, नवी मुंबई.
महानगरपालिका आयुक्त, नागपूर, पुणे, औरंगाबाद, ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, कल्याण-डोंबिवली, अमरावती, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नवी मुंबई, उल्हासनगर, नांदेड-वाघाळा, सांगली-मिरज-कुपवाड, अकोला, वसई-विरार, भिवंडी-निजामपूर, मिरा-भाईंदर, अहमदनगर, मालेगाव, जळगाव, धुळे, परभणी शहर, पनवेल, लातूर व चंद्रपूर.
सर्व पोलीस उप महानिरीक्षक, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
जिल्हाधिकारी, मुंबई, उपनगर जिल्हा
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
महालेखापाल-१ महाराष्ट्र, मुंबई (पत्राने)
महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर (पत्राने)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, मुंबई
संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद/उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
विरोधी पक्ष नेते विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
कार्यकारी अभियंता, इलाका शहर विभाग, बांधकाम भवन, मुंबई
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-१, मुंबई

Scanned by CamScanner

कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग-२,मुंबई
कार्यकारी अभियंता,मध्य मुंबई विद्युत विभाग / दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई
संचालक, उपवने व उद्याने, बांधकाम भवन, मुंबई
आयुक्त, क्रिडा व युवक सेवा सेंट्रल बिल्डींग पुणे.

२. विभागीय आयुक्त, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व कोकण यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पोलिस अधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणाऱ्या पथकांच्या अधिकाऱ्यांशी विचार विनिमय करुन प्रजासत्ताक दिनी मुख्यालयात संयुक्त संचलनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

३. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधित जिल्हाधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणाऱ्या पथकांच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन मुंबई व जिल्हा मुख्यालये येथे संयुक्त संचलनाची व्यवस्था करावी.

४. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य मुंबई, यांनी विभागीय ठिकाणी व जिल्हा मुख्यालय येथे नेहमीप्रमाणे देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे व या कार्यक्रमांना कोणत्याही करमणुकीच्या कार्यक्रमाचे स्वरुप नसावे याकरिता योग्य ती तजवीज करावी. मुंबईत दरवर्षीप्रमाणे चौपाटी, नरेपार्क, वांद्रे येथील शासकीय वसाहत या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करावे.

Rajendra G Gaikwad

Digitally signed by Rajendra G Gaikwad
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e18e8c2154c8ecbcf0edc1fcc5b3e74c50aa53537f32c40ea2c1af9814e56681, cn=Rajendra G Gaikwad
Date: 2020.01.14 15:44:25 +05'30'

( रा. गो. गायकवाड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार)

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
18 JAN 2020
समय ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८,
क्रमांक (मआपो) ८०६

Scanned by CamScanner

# प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम, २६ जानेवारी २०२०

## बृहन्मुंबईसाठी

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ५-०० | महत्वाच्या ठिकाणी सनई चौघडा वादन |
| सकाळी | ६-३० | संघटित प्रयत्नांनी शहरांच्या भागात प्रभात फेऱ्या आयोजित करण्यात याव्यात. |
| सकाळी | ८-०० | शहरांच्या सर्व भागात, सर्व इमारतींवर, शाळांवर व महाविद्यालयांवर राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत. |
| *सकाळी | ९-१५ | ध्वजवंदन व समारंभपूर्वक संचलन. |
| *सकाळी | १०-०० | शहरांच्या जास्तीत जास्त भागाचा अंतर्भाव करुन संचलन, शिक्षण विभागाच्या कक्षेत येणाऱ्या संस्थानी "प्रजासत्ताक महोत्सव" या पुस्तिकेत दिल्याप्रमाणे आपले सामुदायिक कार्यक्रम आयोजित करणे तसेच इतर संस्थानी आपले विविधतापूर्ण देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतींसाठी कार्यक्रम आयोजित करावे व खेळांचे कार्यक्रम आयोजित करणे. |
| *संध्याकाळी | | सोयीनुसार देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे. |

## विभागीय व जिल्हा मुख्यालयांसाठी

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ६-३० | प्रभात फेऱ्या |
| सकाळी | ८-०० | प्रत्येक भागातील शाळा, महाविद्यालये व इतर जास्तीत जास्त इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणे. |
| *सकाळी | ९-१५ | ध्वजवंदन आणि विभागीय व जिल्हा मुख्यालय किंवा ऐतिहासिक अथवा राष्ट्रीय महत्वाच्या ठिकाणी पोलिस, गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना व रेल्वे सुरक्षा दल यांचे संयुक्त संचलन |
| *सकाळी | १०-०० | शहरांच्या जास्तीत जास्त भागाचा अंतर्भाव करुन पोलिस, गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना व रेल्वे सुरक्षा दल यांचे संयुक्त संचलन, शिक्षण विभागाच्या कक्षेत येणाऱ्या संस्थानी "प्रजासत्ताक महोत्सव" या पुस्तिकेत दिल्याप्रमाणे देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतींसाठी सामुदायिक कार्यक्रम आयोजित करणे. |
| *संध्याकाळी | | सोयीनुसार देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे. |

## ग्रामीण विभागांसाठी

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ६-०० | गावाची साफ सफाई. |
| सकाळी | ६-३० | प्रभात फेऱ्या. |
| सकाळी | ८-०० | चावड्या, सार्वजनिक कार्यालये, दवाखाने, वाचनालये, शाळा, खाजगी इमारत अशा गावातील जास्तीत जास्त ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत. |
| सकाळी | ८-३० | शिक्षण विभागाच्या कक्षेत येणाऱ्या संस्थानी "प्रजासत्ताक महोत्सव" या पुस्तिकेत दिल्याप्रमाणे देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतींसाठी सामुदायिक कार्यक्रम आयोजित करावे. सार्वजनिक विहिरी व गावांची तळी स्वच्छ करणे, रस्त्याची दुरुस्ती इत्यादी स्वखुशीचे कार्यक्रम श्रमदानातून करावेत. |
| संध्याकाळी | ५-०० | मिरवणुका |

---

* अशी खूण असलेले कार्यक्रम हे शासकीय समारंभ आहेत. इतर कार्यक्रम प्रजासत्ताक दिन समारंभाच्या नागरीकांच्या समितीने अशासकीय प्रतिनिधीक संस्थांच्या मदतीने, वरील दिवशी करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा आहे.

Scanned by CamScanner